ICE 'n' SPICE
व्हेज रेस्टॉरन्ट
पंजाबी डिशेस् । पावभाजी । चाईनीज । ज्युसेस् । आईस्क्रीम
गोदावरी कॉम्प्लेक्स, व्ही.आय.पी.रोड, नांदेड
मो. 9422172572, 9850430189

सायं दैनिक
# नांदेड वार्ता
www.nandedwarta.com

•वर्ष २४ वे • अंक २८० • बुधवार दि.५ ऑगस्ट २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना/एनएनडी/आरएनपी-२६२/२०२६-२०२८ • पाने ४ • किंमत १ रु.

### सुप्रिम कोर्टात कपिल सिब्बल यांचा जोरदार युक्तीवाद
## शिंदे गटाचे सर्व आमदार अपात्रच



नवी दिल्ली: शिवसेनेचे नेते तथा राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि त्यांच्यासोबत गेलेले आमदार सुरत व गुवाहाटीत असताना भाजपच्या सातत्याने संपर्कात होते. सरकार पाडण्यासाठी त्यांनी भाजपशी हातमिळवणी केली होती. त्यामुळे त्यांच्या सर्व कृती पक्षविरोधी असून, दहाव्या अनुसूचीनुसार (पक्षांतरबंदी कायदा) ते आपोआप अपात्र ठरतात, असा जोरदार युक्तीवाद शिवसेना ठाकरे गटाचे वकील कपिल सिब्बल यांनी आज सर्वोच्च न्यायालयात केला.

शिवसेना पक्ष आणि धनुष्यबाण चिन्हावरील वादाच्या सुनावणीत ठाकरे गटाचे ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल यांनी बुधवारी सर्वोच्च न्यायालयात शिंदे गटाविरोधात सविस्तर युक्तिवाद केला. सिब्बल यांनी सांगितले की, उद्धव ठाकरे हे शिवसेना पक्षप्रमुख असताना त्यांनीच एकनाथ शिंदे यांची गटनेते म्हणून नियुक्ती केली होती आणि त्याची माहिती निवडणूक आयोगालाही देण्यात आली होती. मात्र, बंडानंतर विधिमंडळ पक्षाने स्वतःच गटनेता आणि मुख्य प्रतोद बदलण्याचा निर्णय घेतला, जो कायदेशीरदृष्ट्या ग्राह्य ठरत नाही. विधिमंडळ पक्ष आणि राजकीय पक्ष या दोन वेगळ्या संस्था असून, गटनेता किंवा मुख्य प्रतोद बदलण्याचा अधिकार केवळ राजकीय पक्षालाच आहे, असा मुद्दा त्यांनी ठामपणे मांडला.सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक चिन्ह हे मूळ राजकीय पक्षाचे मानायचे की विधिमंडळ पक्षाचे, असा महत्त्वाचा प्रश्न उपस्थित केला. त्यावर सिब्बल यांनी निवडणूक पान ४ वर

## राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे जोडे मारो आंदोलन
### हर्षवर्धन सपकाळ यांच्या वक्तव्याचा तीव्र निषेध

नांदेड/प्रतिनिधी-राष्ट्रवादी काँग्रेसच्या अध्यक्षा व राज्याच्या उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्रा पवार यांच्या विषयी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी आक्षेपार्ह व बदनामीकारक वक्तव्य केल्याच्या निषेधार्थ राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्यावतीने आज (बुधवार) सकाळी शहरातील आयटीआय चौकात हर्षवर्धन सपकाळ यांच्या प्रतिमेला जोडे मारो आंदोलन करुन तीव्र निषेध केला आहे.




उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्रा पवार यांच्या विषयी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी गुंगी गुडीया असे आक्षेपार्ह वक्तव्य केले आहे. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात तीव्र असंतोष पसरला असून सपकाळ यांच्या विरोधात राज्यभरात ठिकठिकाणी आंदोलन होत आहे. आज (बुधवार) सकाळी आयटीआय चौकातील महात्मा फुले यांच्या पुतळ्यासमोर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांनी हर्षवर्धन सपकाळ यांच्या फोटोला जोडे मारुन तीव्र निषेध केला आहे. यावेळी बोलतांना पान ४ वर


## जीआरनंतर दोन नगरसेविकांचे कुणबी जात प्रमाणपत्र अवैध
### पडताळणी समितीच्या निर्णयाने राज्यात खळबळ;मराठा आरक्षणाच्या वादाला नवे वळण

छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी- छत्रपती संभाजीनगर येथील ज्योती शिंदे आणि गंगापूर नगरपरिषदेच्या सदस्या वर्षा गायकवाड यांचे कुणबी जात प्रमाणपत्र संबंधित जात पडताळणी समितीने अवैध ठरवल्याने मराठवाड्यासह राज्यभरात मोठी खळबळ उडाली आहे.

मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर राज्यात पुन्हा एकदा नवा पेच निर्माण झाला असून, मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण मिळावे, या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली गेल्या काही महिन्यांत राज्यभर आंदोलनांची मोठी लाट उसळली होती. या आंदोलनांच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने अध्यादेश व शासन निर्णय (जीआर) जारी करून वंशावळीच्या आधारे पात्र मराठा नागरिकांना कुणबी प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया सुरू केली होती. त्यानंतर राज्यातील हजारो नागरिकांना कुणबी प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले.मात्र, या प्रमाणपत्रांची जात पडताळणी सुरू असताना काही प्रकरणांमध्ये आवश्यक पुरावे व नोंदींच्या आधारे प्रमाणपत्रे वैध ठरत नसल्याचे समोर येत आहे. त्याचाच भाग म्हणून ज्योती शिंदे आणि वर्षा गायकवाड यांचे कुणबी प्रमाणपत्र अवैध ठरविण्यात आले. या निर्णयामुळे जीआरनंतर जारी करण्यात आलेल्या इतर प्रमाणपत्रांच्या वैधतेबाबतही प्रश्न उपस्थित होऊ लागले आहेत.या निर्णयामुळे मराठवाड्यासह राज्यभरातील कुणबी प्रमाणपत्रधारकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. भविष्यात अशाच प्रकारच्या आणखी प्रकरणांमध्ये प्रमाणपत्रे अवैध ठरल्यास त्याचा परिणाम शैक्षणिक प्रवेश, शासकीय नोकऱ्या, स्थानिक स्वराज्य संस्थांतील निवडणुका तसेच आरक्षणाचा लाभ घेतलेल्या उमेदवारांवर होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.दरम्यान, मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांनी ऑगस्टपासून पुन्हा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे.अशा परिस्थितीत पान ४ वर




भारत-अमेरिका ट्रेड ड्रिल विरोधी जनजागरण मोहिमे अंतर्गत नांदेड येथे आयोजित शेतकरी मेळाव्यात मार्गदर्शन करतांना भारतीय किसान युनियनचे राष्ट्रीय अध्यक्ष राजेश टिकैत दिसत आहेत. यावेळी व्यासपीठावर युद्धबीरसिंग सेहरावत, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर नलावडे पाटील, प्रदेश महासचिव रुपालीताई पाटील, मेळाव्याचे संयोजक रामचंद्र येईलवाड, जिल्हाध्यक्ष सुभाष शिंदे, मोहन पाटील शिरसाट, शिवकांत देवकर्ते, लिंगोजी पा.शिंदे, जगदीश जाधव आदी दिसत आहेत.




शिवसेनेचे नेते व राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांचे बुधवारी नांदेड येथील श्री गुरु गोविंदसिंघजी विमानतळावर आगमन झाले. यावेळी आ.आनंदराव बोंढारकर व माजी आ.शंकरअण्णा धोंडगे यांनी पुष्पगुच्छ देवून त्यांचे स्वागत केले. यावेळी आ.बालाजी कल्याणकर, आ.बाबुराव कदम कोहळीकर, दत्तात्रय पईतवार व इतर उपस्थित होते.

## राजकारणात उतरणार नाही; लोकशाहीच्या रक्षणासाठी संघटनांची एकजूट आवश्यक:सीजेपी

छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी-कॉक्रोच जनता पार्टी सध्या राजकीय पक्ष स्थापन करण्याच्या विचारात नसल्याचे स्पष्ट करत संघटनेचे संस्थापक अभिजीत दीपके यांनी राजकारणात प्रवेशाबाबत सुरू असलेल्या चर्चांना पूर्णविराम दिला. आमची सध्या राजकारणात जाण्याची कोणतीही इच्छा नाही. माध्यमांनाच त्याची अधिक उत्सुकता आहे, असे सांगत त्यांनी देशातील सध्याच्या राजकीय घडामोडींवर तीव्र टीका केली.

माध्यमांशी संवाद साधताना दीपके म्हणाले की, देशातील राजकीय पक्षांची स्थिती चिंताजनक बनली आहे. सकाळी एका पक्षात असलेले आमदार किंवा खासदार संध्याकाळी दुसऱ्या पक्षात दिसतात. केंद्रीय तपास यंत्रणांचा वापर करून राजकीय पक्ष फोडले जात असल्याचा आरोप करत त्यांनी अशा परिस्थितीत लोकशाही बळकट करण्यासाठी राजकीय पक्षांपेक्षा सर्वसामान्य नागरिक आणि सामाजिक संघटनांनी एकत्र येण्याची गरज असल्याचे मत व्यक्त केले.सीजेपीच्या पुढील वाटचालीबाबत छत्रपती संभाजीनगर येथे सुरू असलेल्या बैठकीत सविस्तर चर्चा होत असल्याचेही त्यांनी सांगितले. देशभरात संघटनेचा विस्तार, विविध राज्यांतील विद्यार्थी आंदोलनांना पाठिंबा आणि सामाजिक प्रश्नांवर व्यापक जनआंदोलन उभारण्याच्या रणनीतीवर बैठकीत विचारमंथन सुरू असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.झारखंडमधील विद्यार्थी आंदोलनाला सीजेपीने संपूर्ण पाठिंबा जाहीर केला असून, संघटनेचे प्रतिनिधी लवकरच तेथे जाऊन आंदोलनात सहभागी होणार असल्याची माहिती दीपके यांनी दिली. याशिवाय बेरोजगारी, माध्यमांचे स्वातंत्र्य, न्यायपालिकेची स्वायत्तता तसेच ई-२० इंधन धोरणासंदर्भातील मुद्द्यांवरही बैठकीत चर्चा सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. दरम्यान, सीजेपीचे प्रवक्ते सौरभ दास यांनी विद्यार्थी आंदोलनादरम्यान झालेल्या पोलीस कारवाईचा निषेध व्यक्त केला. आंदोलक विद्यार्थ्यांवर लाठीमार आणि पॅलेट गनचा वापर करण्यात आल्याचा आरोप करत, जखमी पान ४ वर

## महागाईमुळे यंदा गणेशमूर्तींचे दर २५ टक्क्यांनी वाढणार

देगलूर/प्रतिनिधी-यंदा संपूर्ण जिल्ह्यात आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर गणेश मूर्ती बनविण्याचे काम वेगाने सुरू झाले आहे. विविध आकाराच्या आणि आकर्षक देखाव्याच्या मूर्ती तयार करण्यासाठी मूर्तिकारांची लगबग वाढली असली तरी यंदा वाढत्या उत्पादन खर्चामुळे गणेश भक्तांच्या खिशावर भार पडण्याची शक्यता आहे. मूर्तीकारांच्या मते यंदा गणेश मूर्तींच्या किमतीत सरासरी २५ टक्के पर्यंत वाढ होऊ शकते.

इराण-इस्त्रायल संघर्षाच्या पार्श्वभूमीवर आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या दरात वाढ झाली आहे. त्याचा परिणाम पेट्रोलियम पदार्थापासून तयार होणाऱ्या रंग साहित्य, प्लास्टिक, फायबर, ताडपत्री, पॅकिंग साहित्य आणि वाहतूक खर्चावर झाला आहे. त्यामुळे मूर्ती निर्मितीसाठी लागणाऱ्या बहुतांश साहित्याच्या किमती वाढल्या आहेत. याशिवाय जिल्हा व देगलूर तालुक्यात पाणी टंचाईमुळे मूर्तीकाराद्वारे पाणी खरेदी करावे लागत आहे. मूर्ती तयार करण्यासाठी रंग कामासाठी आणि



कार्यशाळातील कामासाठी मोठ्या प्रमाणात पाण्याची गरज भासते. त्यामुळे उत्पादन खर्चात आणखी भर पडत आहे. कच्चा, माल,वाहतूक आणि पाण्याचा वाढलेला खर्च लक्षात घेता यंदा गणेश मूर्तींच्या दरात तीस ते पस्तीस टक्के पर्यंत वाढ होण्याची शक्यता मूर्तिकारांनी व्यक्त केली आहे, त्यामुळे ग्राहकांनाही याचा फटका बसणार आहे. गणेशोत्सव काळात जिल्ह्यात मूर्ती विक्री सजावट पूजा साहित्य आणि संबंधित व्यवसायातून अंदाजे सुमारे ३० ते ३५ हजार कोटींची उलाढाल होते. पर्यावरणाच्या दृष्टीने शाडू मातीच्या मूर्तींना प्राधान्य देण्यात येत आहे. अनेक ठिकाणी पीओपी मूर्तीवरील निर्बंधाचे पालन करण्याच्या आवाहन करण्यात आले आहे. हिंदू पंचांगातील अधिक मासामुळे यंदा गणेशोत्सव नेहमीपेक्षा उशिरा साजरा होणार आहे. त्यामुळे मूर्ती निर्मिती आणि विक्रीची तयारीही काहीशी पुढे ढकलली आहे. देगलूर शहरासह तालुक्यातील अनेक गावामध्ये कार्यशाळासह खाजगी ठिकाणी गणेश मूर्ती घडविण्याचे काम सुरू आहे. कारागीरांनी जून महिन्यापासून बुकिंग सुरू केली आहे. काही ठिकाणी नोंदणी होत आहे. वाढत्या खर्चा नंतरही गणेश भक्तांच्या आवडीनुसार आकर्षक व पर्यावरण पूरक मूर्ती उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे मूर्तिकारांनी सांगितले.

## वीजेचा शॉक लागून तरुणाचा दुर्दैवी मृत्यू

नांदेड/प्रतिनिधी-नांदेड शहरातील खडकपुरा परिसरात वीजेच्या खांब्यातील वीजेचा शॉक लागून एका ३७ वर्षीय तरुणाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना मंगळवारी रात्री घडली आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, मंगळवारी मध्यरात्री साडेअकरा ते बारा वाजण्याच्या सुमारास खडकपूरा परिसरातील वीजपुरवठा अचानक खंडित झाला. त्यावेळी शुऐब अब्दुल गफार (वय ३७) हे आपल्या कुटुंबीयांसोबत घरी होते. वीज गेल्यानंतर ते घराबाहेर पडले. सुमारे दहा ते पंधरा मिनिटांनी वीजपुरवठा पूर्ववत झाल्यानंतर त्यांच्या ओरडण्याचा आवाज आला. कुटुंबीय बाहेर धावले असता, घरासमोरील वीजेच्या खांबावर वीजेचा शॉक लागलेल्या अवस्थेत शुऐब दिसून आले. घटनेची माहिती मिळताच वजीराबाद पोलीस, नांदेड महानगरपालिकेचे अग्निशमन दल आणि पान ४ वर

# राज्यासह देशात अतीवृष्टीचे रौद्ररुप; संभाव्य दुर्घटनांपासुन स्वत:ला सांभाळा

सध्याच्या परिस्थितीत देशातील बहुतांश राज्यांमध्ये अतीवृष्टीमुळे अनेक ग्रामीण भाग, शहरी भाग व अती दुर्गम भाग जलमग्न झाल्याचे दिसून येते सोबतच मानवीय, वित्तीय व पशुंची हाणी मोठ्या प्रमाणात होत आहे. याकरीता प्रत्येकांनी सावधगिरीचे उपाय म्हणून नदी-नाले, तलाव, डोह, रोडचे खड्डे व रोडची वळणे यापासून सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे. देशात सध्याच्या परिस्थितीत एक-दोन दिवस एकसारखा पाऊस आला की, संपूर्ण परिसर जलमग्न होतो आणि त्याचे दुष्परिणाम मानव,पशुपक्षी व वित्तीय हाणीच्या रूपात सर्वांनाच भोगावे लागते. याचे मुख्य कारण म्हणजे देशातील मोठ्या प्रमाणात होणारी जंगलतोड होय.आज जंगलतोडीमुळे हवामानात आमुलाग्र बदल झाल्याचे दिसून येते याचा परिणाम निसर्गावर तर होतच आहे. परंतु मानवाच्या आरोग्यावर सुध्दा मोठा आघात करीत आहे.त्यामुळे देशात वाढती ढगफुटी, सुनामी, भुकंप, अती पाऊस, अती उष्णता इत्यादी अनेक नैसर्गिक आपदांचा सामना संपूर्ण जीवसृष्टीला करावा लागतो आहे. कारण वाढते सिमेंट रोड, शहरीकरण, औद्योगिकरण इत्यादींमुळे अनेक कारणांमुळे गावखेडे नष्ट होत आहेत.

आज प्रत्येक शहराच्या केंद्रस्थानापासुन २० किलोमीटरपर्यंत शहराचे जाळे पसरल्याचे दिसून येते. यामुळे पाऊसाचे पाणी जमिनीत न जाता सरळ नदी-नाल्यांना,तलाव,धरण यांना जाऊन मिळते व अशा परिस्थितीत सर्वत्र पुरपरिस्थिती निर्माण झालेली दिसून येते. त्याचप्रमाणे शहरी भागात सिमेंट रोड झाले खरे पण ड्रेनेज सिस्टीमचा अभाव असल्याने राज्यासह देशातील अनेक शहर जलमग्न होतांना दिसतात व शहरात पुरपरिस्थिती निर्माण होते.असे अनेक उदाहरणे आपल्या डोळ्यासमोर आहेत आणि त्याचे परिणाम भोगत सुध्दा आहोत. कारण देशातील अनेक राज्यात पावसाचे थैमान;पूर-भूस्खलनाचा धोका निर्माण झाला आहे. आताही महाराष्ट्रात मुसळधार पावसाची शक्यता वर्तवली जात आहे यामुळे ७ जिल्ह्यात पावसाचा येलो अलर्ट जाहीर करण्यात आला आहे.नुकत्याच झालेल्या विदर्भातील तुफान पावसामुळे सहा जणांचा मृत्यू झाला. यवतमाळ जिल्ह्यातील दारव्हा-लोणी मार्गावरील कुमटी नदीच्या पुलावरून कार वाहून गेल्याने आईसह दोन मुलींचा मृत्यू झाला. भंडारा



आणि वर्ध्यात प्रत्येकी एक वाहून गेल्याने दगावले, बुलढाण्यात भिंत कोसळून महिला दगावली, भिवंडी शहरातील भोईवाडा गंगारामवाडी परिसरातील कोहिनूरही धोकादायक इमारत कागदी पत्याच्या बंगल्यासारखी गुरुवारी रात्री कोसळून झालेल्या भीषण दुर्घटनेत १० लोकांचा मृत्यू झाला.अशाप्रकारे राज्यात अती पावसामुळे आतापर्यंत ७६ जणांचा मृत्यू झाला तर ८१ जण गंभीर जखमी झाल्याचे सांगितले जाते.म्हणजे आपण

**रमेश लांजेवार**
नागपूर

ज्याप्रमाणे निसर्गावर अत्याचार करीत आहोत त्याच्या दुप्पट तो पावसाच्या रूपात रौद्र रूप धारण करून संपूर्ण सृष्टीवर घणाघाती प्रहार करीत आहे आणि याला दोषी आपणच म्हणजे संपूर्ण मानवजाती आहे.आज वृक्षारोपण मोठ्या प्रमाणात केल्याचे सांगितले जाते. परंतु ८० टक्के वृक्षारोपण हे फक्त कागदावरच असल्याचे दिसून येते. कारण आपण हजारो एकर जमीनीवरील वृक्ष कटाई केली आणि त्याठिकाणी उद्योग धंदे, शहरीकरण,खाणी, औद्योगीकरण, रस्त्यांचे जाळे विणले मग वृक्षारोपण कुठे केले? जर वृक्षारोपण केले तर पाणी जमिनीत का मुरत नाही याचाही अभ्यास सरकारने करायला हवा. राजकीय पुढारी एक वृक्ष लावते आणि फोटो काढून मिडिया समोर फोटोसेशन करते ही कसली वृक्षलागवड म्हणायची! याला वृक्षलागवड म्हणता येणार नाही तर हा फक्त ड्रामा म्हणावा लागेल. आजही राज्यासह देशातील अनेक भागात बंजार जमीन किंवा पडीत जमीन आहे. त्याठिकाणी मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड व्हायलाच पाहिजे आणि त्या वृक्षांची जोपासना सुध्दा व्हायला पाहिजे. तेव्हा अती पाऊसाचा ओघ थांबविता येईल असे मला वाटते. कारण राज्यासह देशात युध्दपातळीवर वृक्षलागवड झाली नाही तर येणाऱ्या काळात अती पाऊस, अती उष्णता, सुनामी, भुकंपा सारखे महाभयंकर प्रकार रौद्ररूप धारण करून मोठ्या प्रमाणात मानवी, वित्तीय व पशुपक्षांची हाणी पोहचवू शकते यालाही नाकारता येत नाही. अती पावसामुळे दऱ्याखोऱ्यात, ग्रामीण भागात, अती दुर्गम भागात विषेली साप निघतात अशीच घटना ठाण्यामध्ये ग्रामीण भागात घडली गावापासून मुख्य रस्त्याला लागण्यासाठी पक्का रस्ताच नसल्याने डोली करून दऱ्याखोऱ्यांतून पायवाटेने ५ कि.मी.वरील रूग्णालयात डोलीतून घेऊन जातांना चौथीत शिकणाऱ्या ९ वर्षीय मुलाचा झोपेत साप चावल्याने दुर्दैवी मृत्यू झाला अशा भयावह घटना अती पाऊसामुळे होत आहे. राज्यात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसानंतर शनिवारी पावसाचा जोर काहीसा कमी झाला. मात्र गेल्या दोन-तीन दिवसांत घाटमाथा, कोकण, पुणे, सातारा, नाशिक, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातील अनेक भागांत जोरदार पाऊसाने सर्वत्र तारांबळ उडाली. आता पाऊस जरी ओसरला असला तरी १५ तारखेनंतर पाऊसाचा जोर जास्त वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे त्यामुळे सर्वांनीच नदी-नाले,तलाव, धरणे,डोह, दऱ्याखोऱ्यापासुन सावध रहाने गरजेचे आहे. हवामान खात्याने असेही वर्तवले आहे की, पुढील चार दिवसाकरीता विदर्भासह महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांमध्ये पावसाच्या बाबतीत रेड अलर्ट जाहीर करण्यात आला आहे म्हणजे अती पाऊसाचा धोका अजुन पर्यंत टळलेला नाही. देशात अनेक राज्यांमध्ये मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळित झाले आहे. यात उत्तराखंड, छत्तीसगड, केरळ, कर्नाटक, ओदिशा, उत्तरप्रदेश, महाराष्ट्र, बिहार व राजस्थानमध्ये पावसामुळे विविध दुर्घटना घडल्या आहेत. राज्यासह देशात अती पावसामुळे होणाऱ्या दुर्घटना लक्षात घेता संपूर्ण राज्य सरकारांनी सर्वप्रथम रोडच्या खड्ड्यांची दुरूस्ती ताबडतोब करावी व दुर्घटना टाळण्यासाठी प्रत्येक रोडच्या वळणावर आवश्यक ते बोर्ड लावावे व डेंजर झोनच्या ठिकाणी सुरक्षा कर्मचारी तैनात केले पाहिजे. त्याचप्रमाणे वाढत्या पावसाचे प्रमाण पहाता नागरिकांनी व युवकांनी नदी-नाले, तलाव, डोह, धरण व विजांचा लखलखाट यापासून सावधगिरी बाळगली पाहिजे. त्याचप्रमाणे देशात वाढता सेल्फीचा क्रेझ पहाता सेल्फी पॉइंटपासुन सावधगिरी बाळगावी अन्यथा सेल्फीचा क्रेझ महागात पडू शकतो. जय हिंद.

# मोहम्मद इरफानसारख्या लाखोंच्या स्वप्नांचा आक्रोश!

जंतर मंतरवरचे आंदोलन संपलेय. त्या अनुषंगाने देशात विविध दृष्टीकोनातून चर्चा सुरु झालीय. अनेकांची मते समोर येताहेत, त्यातच एका तरुणाने अख्ख्या देशाचे लक्ष वेधून घेतले आहे, त्याचे नाव आहे मोहम्मद इरफान! जंतर मंतरवर त्याने बर्फ विक्रीचा ठेला लावला होता! अंगात जुना टी-शर्ट, चुरगळलेली पॅन्ट आणि गळ्यात स्कार्फ घालून अगदी तळमळीने बोलणारा इरफान पेशाने एक हातगाडीवाला आहे मात्र त्याचा अभ्यास, त्याची प्रगल्भता, मांडणी आणि तळमळ विलक्षण आहे. इरफान दिल्लीतल्या झोपडपट्टीत राहतो.

दिल्लीच्या झगमगत्या रस्त्यांवरून वेगाने धावणाऱ्या मोटारींच्या काचांतून भारत वेगळा दिसतो; पण त्याच शहराच्या कडेने पसरलेल्या झोपडपट्ट्यांतून चालत गेल्यावर दुसराच भारत भेटतो. त्या भारतात पावसापासून संरक्षण देणारे छप्परही कायमस्वरूपी नसते, दिवसाची मजुरी उद्याच्या भाकरीची खात्री देत नाही आणि भविष्य हा शब्द अनेकदा शब्दकोशातच राहतो. अशाच एका झोपडपट्टीत, काही चौरस फुटांच्या कच्च्या घरात राहणारा मोहम्मद इरफान अचानक देशाच्या चर्चेत आलाय. त्याच्या हातात कोणतेही पद नाहीये, त्याच्यामागे कोणतीही संघटना नाही, त्याने कोणत्याही विद्यापीठाची पदवी मिळवलेली नाही. तरीही त्याचे बोलणे लाखो लोक ऐकताहेत, ही मोठी लक्षणीय गोष्ट आहे! गरिबी, अनेकदा माणसाचे शिक्षण हिरावून घेते. इरफानच्या बाबतीतही तसेच झाले. त्याने नियमित शालेय शिक्षण घेतले नाही. न अडखळता वाचता-लिहिता येत नसल्याची कबुली तो स्वतः देतो. पण ज्ञानाची भूक मात्र त्याने मरू दिली नाही. हीच त्याच्या आयुष्याची सर्वात विलक्षण बाजू आहे. ज्ञानाकडे जाणारा त्याचा मार्ग पुस्तकांच्या पानांतून नव्हे, तर मोबाईलच्या स्पीकरमधून गेलाय. तो व्हॉईस सर्चवर आधारित ध्वनी सहाय्यकांचा वापर करून आपली जिज्ञासा शमवून घेतो! इतिहास, संविधान, साहित्य, स्वातंत्र्यलढा, भगतसिंग, गांधी, दुष्यंत कुमार, अदम गोंडवी, जे काही समजून घ्यायचे असेल, ते तो ऐकतो. एखादे उत्तर पटले नाही, तर पुन्हा विचारतो. पुन्हा खात्री करतो. माहितीची पडताळणी करण्याचा प्रयत्न करतो. त्यातून त्याने विलक्षण ज्ञानप्राप्ती केलीय आणि जोडीने विवेकाची कास धरलीय!

जंतर मंतरवरची त्याची मुलाखत



प्रचंड व्हायरल झालीय, देशातल्या अनेक नामवंत विवेकी ज्ञानी मंडळींनी त्याच्याविषयी लिहिलंय. तो ह्या आंदोलनाचा चेहरा होण्याइतका मोठा नव्हता, मात्र आजघडीला सर्वत्र त्याची चर्चा आहे. भावनांच्या आहारी न जाता, देशाच्या लोकशाहीवर आणि त्यातील सहभागावर, आपल्या अंतरात्म्याच्या आवाजाद्वारे त्याने आपला हक्क ज्या पद्धतीने सांगितलाय ती थक्क करणारी आहे. त्याचे मुद्दे विलक्षण प्रभावी आहेत.सरकार, लॉजिस्टिक्स म्हणजेच मालवाहतूक व वितरण व्यवस्था आणि देशाचा जीडीपी वाढवण्या बद्दल बोलते;

**समीर गायकवाड**

सरकार मोठ्या उद्योगांना कमी व्याजाची कर्जे आणि स्वस्त वीज पुरवते. पण सरकार मजुरांना त्यांच्या कष्टाचा योग्य मोबदला किंवा किमान वेतन देऊ शकत नसेल तर तुमच्या त्या जीडीपीचा काहीच उपयोग नाही, असे म्हणत त्याने देशातील गरीब मजुरांच्या समस्यांकडे लक्ष वेधलेय.एखादा मजूर पाचशे रुपये कमवून घरी आणतो; त्यातून मीठ, साबण, तांदूळ आणि पीठ खरेदी करतो आणि त्या खरेदीवरही तो टॅक्स भरतो. ते देखील भारताचे करदाते आहेत; ते कोणाच्या दयेवर जगत नाहीत; गरीब मजुरांच्या वतीने बोलताना त्याचा श्वास कोंडला होता, अश्रू अनावर झाले होते.

तो म्हणतो की, मी कुठेतरी ऐकलेय की, हा देश 'सुवर्णकाळातून' जात आहे, तरीही आजही बहुसंख्य भारतीय किमान उत्पन्नापेक्षा कमी पैशांवर गुजराण करतात आणि शारीरिक कष्ट करणारे मजूर म्हणून काम करतात. इरफानची हतबलता, समाजाची सदसद्विवेकबुद्धी जागृत करते, मन हेलावून टाकते आणि आपल्याला अंतर्बाह्य हादरवते; आपल्याला त्याची व्यथा जाणवते, पण पुढच्याच क्षणी जाणवते की, इरफान म्हणतो तसे आपण सारेच हतबल झालो आहोत.इरफान म्हणतो की, मजुरांबद्दल कोणीच बोलत नाही; मजूर रस्त्यावर उतरून आंदोलन करू शकत नाहीत. जर त्यांनी एक दिवसही काम बुडवले, तर त्यांच्या घरी चूल पेटणार नाही; मजूर निषेध करू शकत नाहीत. हे सांगताना त्याला रडू कोसळलं. मजुरांवर अन्याय आणि क्रूरता करण्याचा अधिकार कोणत्याही सरकारला नाही हे तो बजावून सांगतो.केवळ इंटरनेटचा वापर करणारा एखादा मजूर किंवा हातगाडीवाला आर्थिक संकटाचे इतके सखोल ज्ञान कसा बाळगू शकतो, असा प्रश्न आपल्याला पडू शकतो. ह्या प्रश्नाआडून आपण सत्य नाकारू शकत नाही. पाच ट्रिलियनची अर्थव्यवस्था बनण्याच्या दिशेने वाटचाल करणाऱ्या भारतात मजुरांची अवस्था किती दयनीय आहे, हे इरफान अगदी स्पष्टपणे मांडतो!

आपल्या कक्षेबाहेरील आणि बौद्धिक पातळीवरील विषयांवरही त्याचे विचार अगदी स्पष्ट आहेत. अशी माणसं झोपडपट्ट्यांतून आणि संघर्षातून वर येतात, मनातील भावना मोकळेपणाने मांडतात; त्यांच्या शब्दांतून शहाणपण एखाद्या प्रवाही नदीसारखे वाहते, जे थेट आपल्या काळजाला भिडते आणि दीर्घकाळ आपल्या मनात साद घालते. नव्या पिढीत अशी माणसे अस्तित्वात आहेत, ह्या गोष्टीचाही आता अभिमान वाटू लागलाय, कारण विवेकाची चूड पेटवण्याच्या काळात, एक अल्पशिक्षित तरुण हातगाडीवाला देशातल्या नामवंत अर्थशास्त्रज्ञांनाही लाजवेल असे लॉजिक मांडतो तेव्हा आपण दिग्मूढ होतो! इरफानच्या बोलण्यात आकडेवारी आहे; पण आकड्यांपेक्षा त्यामागची माणसे जास्त टोकदार आहेत. तो अर्थव्यवस्थेवर भाष्य करतो, पण शेअर बाजाराच्या भाषेत नाही. त्याची अर्थव्यवस्था दिवसाची मजुरी, घरभाडे, औषधाचा खर्च आणि स्वयंपाकाच्या गॅसपर्यंत मर्यादित आहे. त्यामुळे त्याचे प्रश्न अर्थशास्त्राच्या ग्रंथातून आलेले नाहीत; ते रोजच्या जगण्यातून आलेले आहेत.तो स्वत:ला कोणत्याही राजकीय पक्षाशी जोडत नाही. सत्तेत जाण्याची महत्त्वाकांक्षा नसल्याचे सांगतो. महात्मा गांधींच्या अहिंसेवर विश्वास असल्याचेही तो नमूद करतो. आंदोलनात सहभागी होणे, प्रश्न विचारणे आणि संविधानाचा उल्लेख करणे, याचा अर्थ एखाद्या पक्षाचे प्रतिनिधित्व करणे असा नसतो, हे तो अधोरेखित करतो.

मोहम्मद इरफान सारखे तरुण गरीब असूनही या भूमीचा वारसा आणि देशाचे भविष्य आहेत, एका तेजस्वी आणि विशुद्ध विचारसरणीचे धनी आहेत. ह्या अनुषंगाने एक प्रश्न असा विचारावा वाटतो की, अशांच्या दयनीय अवस्थेला कोण जबाबदार आहे? अशा लोकांची काळजी कोण घेणार? त्यांना न्याय कोण मिळवून देणार? आणि या गरीब मजुरांसाठी आवाज कोण उठवणार? जंतर मंतरवर लाखो लोकांच्या गर्दीत, जिथे 'जेन झी'ला बदमाश ठरवले जात होते, तिथे इरफानने सरकारला आरसा दाखवलाय. आंदोलन सुरु असताना कदाचित त्याला कोणी नीट पाहिले नसेल, परिणामी मंचावर बोलण्याची परवानगी त्याला मिळाली नाही. तो मंचावर आला असता तर भगतसिंगांचा अंश नव्याने समोर आला असता! त्याने या देशातील तरुणांमध्ये आणखी थोडा उत्साह भरला असता. संवादाशिवाय दुसरा कोणताही मार्ग नाही, हे सरकारला सांगितले असते.

आपल्या देशाचे राजकारण हिंदू-मुस्लिम आणि जातीच्या आधारावर विभागलेले आहे, आणि या देशात असेच तरुण लोकशाही जिवंत ठेवत आहेत हे वास्तव त्याच्या रूपाने ठळकपणे समोर आलेय. मोहम्मद इरफानची खरी ताकद त्याच्या प्रश्नांत आहे. त्याच्या प्रश्नांची उत्तरे कुणापाशीच नाहीत! ती समाजाने, सरकारने आणि नागरिकांनी मिळून शोधायची आहेत. कदाचित म्हणूनच मोहम्मद इरफानची कथा एका व्यक्तीची राहत नाही; ती भारतीय लोकशाहीतील त्या असंख्य चेहऱ्यांची कथा बनलीय, जे रोज श्रम करतात, रोज जगण्यासाठी लढतात, आणि तरीही जगाकडे प्रश्न विचारण्याचे धैर्य सोडत नाहीत.त्याच्या तळहातांवर श्रमाचे घट्टे आहेत; पण त्या हातांनी उचललेला सर्वांत मोठा भार कदाचित विटांचा किंवा हातगाडीचा नाही, तर स्वत:ला आणि समाजाला सतत प्रश्न विचारण्याचा आहे. देशाच्या मेनस्ट्रीम मीडियात असा एकही अँकर नाही, जो अशा गोष्टी स्पष्टपणे बोलत नाही... एवढ्या हुशार व्यक्तीला औपचारिक शिक्षण का मिळालं नाही? त्याच्यासारख्या लाखो लोकांच्या स्वप्नांचा आक्रोश कोणी ऐकणार की नाही हा कळीचा प्रश्न आहे! हा अफलातून तरूण दिल्लीच्या झोपडपट्टीत राहतो. त्याला सलाम!

- *एबीपी माझा वरुन साभार.*

# आदिवासी भागाच्या सर्वांगीण विकासासाठी समन्वयाने काम करा:सीईओ महेश पाटील



नांदेड/प्रतिनिधी- आदिवासीबहुल किनवट तालुक्यातील प्रत्येक गावापर्यंत शासनाच्या विकास योजनांचा लाभ प्रभावीपणे पोहोचला पाहिजे. पेसा अंतर्गत उपलब्ध निधी वेळेत, पारदर्शकपणे आणि गुणवत्तापूर्ण विकासकामांसाठी खर्च करून आदिवासी भागाच्या सर्वांगीण विकासाला गती द्यावी. सर्व विभागांनी परस्पर समन्वयाने काम करत निश्चित कालमर्यादेत ग्रामविकासाची उद्दिष्टे पूर्ण करावीत, असे निर्देश जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक महेश पाटील यांनी दिले.

सीईओ चा पदभार स्वीकारल्यानंतर श्री. पाटील यांनी आदिवासीबहुल किनवट तालुक्याचा दौरा केला. पंचायत समिती, किनवट येथे झालेल्या तब्बल दोन तासांच्या मॅरेथॉन आढावा बैठकीत त्यांनी विविध विभागांच्या कामकाजाचा सखोल आढावा घेत विकासकामांना गती देण्याच्या सूचना दिल्या. बैठकीस अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे, ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रभारी प्रकल्प संचालक तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार मुक्कावार, पंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी डी. बी. गीरी, गटविकास अधिकारी जयश्री वाघमारे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. बैठकीत प्रधानमंत्री आवास योजना, व्हीबी-जी-रामजी, कर वसुली, पेसा, शाळा व अंगणवाडी तसेच ग्रामपंचायतींच्या विविध विकास योजनांचा सविस्तर आढावा घेण्यात आला.शाळा व अंगणवाड्यांना शुद्ध पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यास प्राधान्य द्यावे. तसेच १५ व १६ व्या वित्त आयोगाच्या निधीतून शाळा व अंगणवाडीत विद्युत व सौरऊर्जासाठी आवश्यक तरतूद करण्याचे निर्देश सीईओ पाटील यांनी दिले. पेसा अंतर्गत मंजूर निधी वेळेत खर्च करून विकासकामे गुणवत्तापूर्ण पद्धतीने पूर्ण करावीत. विकासकामांमध्ये अडथळा निर्माण करणाऱ्यांविरुद्ध नियमानुसार कठोर कारवाई करण्यात येईल, असा स्पष्ट इशाराही त्यांनी दिला.सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन नियम-२०२६ ची सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार प्रभावी अंमलबजावणी करण्याचे निर्देश देताना प्रत्येक ग्रामपंचायतीत कचऱ्याचे चार प्रकारांत संकलन, विलगीकरण आणि व्यवस्थापन प्रभावीपणे राबविण्यावर त्यांनी विशेष भर दिला. घरकुलांची उद्दिष्टपूर्ती, व्हीबी-जी-रामजी योजनेची कामे, कर वसुली व स्वच्छ भारत अभियानाच्या प्रगती बाबत संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करून सर्व कामे वेळेत पूर्ण करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. स्मशान भूमीसाठी जागा उपलब्ध करून देण्याच्या प्रश्नावर विस्तार अधिकारी व ग्रामपंचायत अधिकाऱ्यांनी तातडीने प्रत्यक्ष पाहणी करून प्रश्न मार्गी लावावा, असे निर्देश देतानाच आदिवासी भागातील नागरिकांना शासनाच्या सर्व योजनांचा प्रत्यक्ष लाभ मिळावा यासाठी अधिकारी व कर्मचाऱ्यांनी नियमित क्षेत्रभेटी घेऊन गाव पातळीवरील विकासकामांना गती द्यावी, असे आवाहनही त्यांनी केले.

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
**मुख्यसंपादक**-प्रदीप नागापूरकर, भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
**सहसंपादक**-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

# बीएलओची मतदार शोध मोहीम अंतिम टप्प्यात;स्थलांतरित,मृत,दुबार मतदार यादीतून होणार बाद

मुदखेड/प्रतिनिधी-तालुक्यात विशेष मतदार यादी पुनरीक्षण मोहीम तहसील प्रशासनामार्फत प्रभावीपणे राबवली जात असून प्रत्येक गावातील बीएलओ ना मतदार शोधताना पायपीट करावी लागत आहे. मतदार यादीतील मतदार प्रत्यक्षात गावातच राहत नसल्याचे चित्रसमोर आले आहे.

अनेक घरे बंद तर काही कुटूंबे कायमस्वरूपी स्थलांतरित असल्याचे आढळून आले आहे. गेल्या अनेक वर्षापासून मतदार यादीत असलेल्या वृत्त व्यक्तींना वगळण्यात येत असून नवीन मतदार यादी शुद्धीकरणाची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आली असली तरीही गायब असलेले मतदार नव्या यादीतून डिलीट होणार असल्याच्या धास्तीने लोकप्रतिनिधी बीएलओची मात्र तारांबळ उडाली आहे. केंद्रीय निवडणूक आयोग विशेष मतदार यादी पुनरीक्षण मोहीम अंतर्गत सन २००२ मतदार यादी नव्याने तयार केली जात आहे. यासाठी तालुक्यातील प्रत्येक गावात मतदार यादी दुरुस्ती प्रक्रियेचे काम प्रगतीपथावर आहे. उपविभागीय अधिकारी प्रवीण मेंगशेट्टी, तहसीलदार आनंद देऊळगावकर, पंचायत समिती गटविकास अधिकारी शेखर देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभावीपणे राबवली जात आहे. तहसील प्रशासनाने गाव पातळीवर शासकीय बीएलओची नियुक्ती केली आहे. यासोबत प्रमुख राजकीय पक्षाने प्रशासनाला सहकार्य करण्यासाठी बीएलओ नियुक्त केले आहेत. नवीन मतदार यादी शुद्धीकरणाची प्रक्रिया ता. २० जून २०२६ पासून वेगात सुरू आहे. प्रत्येक गावात याबाबत जनजागृती करण्यासाठी नायब तहसीलदार मारुती जाधव, नायब तहसीलदार विजयकुमार पाटे, नायब तहसीलदार संतोष कामठेकर यांच्यासह तलाठी, ग्रामसेवक, शिक्षक, अंगणवाडी सेविका, सेवाभावी संस्था आदींनी पुढाकार घेतला आहे. मतदार यादी शुद्धीकरण प्रक्रिया राबवित असताना बीएलओ यांना सर्व बाबीची बारकाईने तपासणी करावी लागत आहे. रोजगार शिक्षण व्यवसायासाठी शहराकडे स्थलांतरित झालेल्या अनेक कुटूंबीयांची नावे अद्यापही गावातील मतदार यादीत कायम असल्याचे पडताळणीत आढळून आले आहे. अनेक घरांना कुलूप असून बीएलओना वारंवार चक्रा माराव्या लागत आहे. याशिवाय काही ठिकाणी एकाच व्यक्तीचे दोन वेगवेगळ्या प्रभागातील मतदार यादीत नाव असल्याचे आढळून आले आहे. यामुळे आता दुबार नोंदणी मतदारांची नावे वगळण्याची प्रक्रिया सुरू आहे. स्थलांतरित मृत व्यक्तीचे नावे मतदार यादीतून वगळण्यात आले आहे. गायब असलेले मतदार आता डिलीट होणार आहेत. प्रत्येक गावातील बीएलओ सर्व पक्षांच्या बीएलओसह नागरिकांना विश्वासात घेऊन मतदार यादीतून नाव वगळले जाऊ नये यासाठी खबरदारी घेतली जात आहे.

बारड ता. (मुदखेड) गाव पातळीवरील नवीन मतदार यादी पुनरिक्षण मोहिमेचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. बीएलओनी सर्वपक्षीयांच्या बीएलओशी सल्ला मसलत करून उर्वरित मतदारांची ओळख पटविण्यासाठी चर्चाही केली. गावात एकूण ८४६९ मतदार आहेत. यापैकी स्थलांतर मतदार ७३२ आढळून आले आहे. मयतची संख्या ४७८ इतकी आहे. दुबार मतदार १०६ आढळून आले आहेत.१३१६ मतदार यादीतून डिलीट होणार असल्याचे सुपरवायझर शिवदर्शन लांडगे यांनी माहिती दिली आहे. मतदार यादी शुद्धीकरण मोहिमेसाठी सहशिक्षक एस पी आंबाड, संतोष राऊत, कृषी सहाय्यक आर.जी.धुमाळ यांची शासकीय स्तरावरून नियुक्ती करण्यात आली होती मोहीम प्रभावीपणे राबविण्यासाठी. बीएलओ संगीता वच्छेवार, रेखा पिनलवार, मनीषा बोंदार्डे, आशा टिमकेकर, संताबाई, संदीप पानबुडे, अमोल दांडेकर, देविदास राठोड यांच्यासह आदींनी परिश्रम घेतले.

# जिल्हा बँकेच्या अध्यक्ष व उपाध्यक्षपदाची १० रोजी निवड

नांदेड/प्रतिनिधी-नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या अध्यक्ष व उपाध्यक्षपदाची निवडणूक सोमवार दि.१० ऑगस्ट रोजी होणार आहे. अध्यक्षपदासाठी मारोतराव कवळे गुरुजी यांचे नाव सध्या तरी आघाडीवर आहे.

नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळाच्या २३ जागांसाठी गेल्या महिन्यात निवडणूक झाली. माजी मुख्यमंत्री व खा.अशोक चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली सर्वपक्षीय पॅनलचे २१ उमेदवार निवडून आले आहेत. तसेच सौ.संगीता विठ्ठल पाटील व कृष्णा पाटील आष्टीकर हे दोघेजण अपक्ष निवडून आले आहेत. शेतकरी विकास पॅनलच्या २१ संचालकांमध्ये सर्वाधिक संचालक भाजपाचे १४ आहेत. त्यामुळे जिल्हा बँकेच्या अध्यक्षपदी भाजपच्याच संचालकाची निवड होणार हे जवळपास निश्चित आहे. अध्यक्षपदासाठी मारोतराव कवळे गुरुजी, माजी आ.माधवराव पाटील जवळगावकर व बी.आर. कदम यांचे नाव चर्चेत आहेत. माजी आ.जवळगावकर व मारोतराव कवळे गुरुजी हे दोघेजण व्याही असून कवळे व जवळगावकर अध्यक्षपदासाठी ईच्छुक आहेत. जवळगावकरांचे नाव त्यांच्या समर्थकांनी पुढेरेटले असले तरी संचालकांमधून त्यांना पाठिंबा मिळणे आवश्यक आहे.दुसरीकडे कवळे गुरुजी यांचे सर्व पक्षातील नेत्यांसोबत चांगले संबंध असल्याने त्यांचे नाव आघाडीवर आहे.

# विष्णुपुरीचे अतिरिक्त पाणी वाया जाऊ नये;सोनखेड, बाभूळगाव,हरबळसह कोरडे तलाव तातडीने भरावेत

नांदेड/प्रतिनिधी-आशिया खंडातील प्रमुख उपसा जलसिंचन प्रकल्पांपैकी एक असलेला विष्णुपुरी प्रकल्प पूर्ण क्षमतेने भरला असून, अतिरिक्त पाणी गोदावरी नदीमार्गे तेलंगणाकडे वाहून जात आहे. हे पाणी वाया जाऊ न देता त्याचे शास्त्रीय आणि लोकहिताचे नियोजन करून सोनखेड, बाभूळगाव, हरबळसह परिसरातील कोरडे तलाव तातडीने भरावेत, अशी मागणी मराठवाडा शेतकरी प्रतिनिधी प्रा. शिवाजी मोरे सोनखेडकर यांनी शासनाकडे केली आहे.

यंदा गोदावरीच्या वरच्या खोऱ्यात झालेल्या दमदार पावसामुळे ११ टीएमसी क्षमतेचा विष्णुपुरी प्रकल्प पूर्ण भरला आहे. धरणातील पाण्याची पातळी नियंत्रित ठेवण्यासाठी खबरदारीचा उपाय म्हणून एक दरवाजा उघडण्यात आला असून, अतिरिक्त पाणी नदीपात्रातून पुढे तेलंगणाच्या दिशेने सोडले जात आहे. हे पाणी वाहून जाऊ देण्याऐवजी परिसरातील जलसाठे भरून भविष्यातील पाणीटंचाई टाळण्यासाठी त्याचा उपयोग करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. प्रा. मोरे यांनी प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, नांदेड शहर, एमआयडीसी तसेच इतर आवश्यक गरजांसाठी आवश्यक पाणीसाठा सुरक्षित ठेवून उर्वरित अतिरिक्त पाण्याचा वापर ग्रामीण भागातील तलाव, लघुधरणे आणि जलसाठे भरण्यासाठी करणे गरजेचे आहे. जिल्ह्यातील अनेक भागांत अद्याप समाधानकारक पाऊस झालेला नसल्याने येत्या काही महिन्यांत पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे. त्याचबरोबर पशुधनासाठीही पाण्याची टंचाई निर्माण होऊ शकते. उपलब्ध पाण्याचे योग्य नियोजन केल्यास भविष्यातील पाणीटंचाई, टँकरद्वारे पाणीपुरवठा आणि त्यावरील शासनाचा अतिरिक्त आर्थिक भार मोठ्या प्रमाणात कमी होऊ शकतो. त्यामुळे जलसंपदा विभागाने तातडीने नियोजन करून विष्णुपुरी प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील तलाव आणि लघुधरणे भरावीत, अशी मागणीही करण्यात आली आहे.




आरक्षण उपवर्गीकरण विरोधी महामोर्चा कृती समितीच्यावतीने दि.९ ऑगस्ट रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य मोर्चा काढण्यात येणार असून महामोर्चाच्या पूर्वतयारी संदर्भात महत्वपूर्ण बैठक डॉ.आंबेडकरनगर येथे संपन्न झाली. या बैठकीला भन्ते पय्याबोधी थेरो यांनी मार्गदर्शन केले. यावेळी रमेश सोनाळे, प्रा.राजू सोनसळे, भरतकुमार कानिंदे, सुखदेव चिखलीकर, संदीप मांजरमकर, सुभाष काटकांबळे, गब्बर सोनवणे, भगवान ढगे व इतर उपस्थित होते.

# तीन ग्रामपंचायतीची राज्यस्तरीय कामगिरी

## येरगी,लिंगनकेरुर,काठेवाडीला'आदिशक्ती पुरस्कार'जाहीर

देगलूर/प्रतिनिधी-महिला व बाल विकास विभागाच्या वतीने राज्यभर राबविण्यात आलेल्या 'आदिशक्ती अभियान' अंतर्गत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या ग्रामपंचायतींना सन २०२५-२०२६ चा 'आदिशक्ती पुरस्कार' जाहीर करण्यात आला असून, देगलूर तालुक्यातील येरगी ग्रामपंचायतने प्रथम, लिंगनकेरूर, ग्रामपंचायतीने द्वितीय तर काठेवाडी ग्रामपंचायत ने तृतीय क्रमांक पटकावत तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे.

महिला व बाल विकास विभागाने ३१ जुलै रोजी जारी केलेल्या शासन निर्णयानुसार हा पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. राज्यातील महिलांच्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक व आरोग्यविषयक सर्वांगीण विकासासाठी 'आदिशक्ती अभियान' रविनाथ येत आहे. अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करणाऱ्या ग्रामपंचायतींना प्रोत्साहन मिळावे, तसेच महिलांच्या सक्षमीकरणासाठी नाविन्यपूर्ण उपक्रमांना चालना मिळावी. या उद्देशाने राज्य, जिल्हा आणि तालुका स्तरावर 'आदिशक्ती पुरस्कार' देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. याच अनुषंगाने विविध निकषावर ग्रामपंचायतचे मूल्यमापन करण्यात आले. देगलूर तालुक्यातील ग्रामपंचायत महिलांचे सक्षमीकरण, आरोग्य, पोषण, शिक्षण, जनजागृती आणि सामाजिक विकासाशी संबंधित उपक्रम प्रभावीपणे राबविल्यामुळे त्यांना हा सन्मान मिळाला आहे.या पुरस्कारामुळे संबंधित ग्रामपंचायतच्या कार्याचा राज्यस्तरावर गौरव झाला असून, इतर ग्राम पंचायतीसाठीही हा आदर्श ठरणार आहे. पुरस्कार जाहीर झाल्यानंतर येरगी, लिंगनकेरूर, आणि काठेवाडी गावामध्ये समाधानाचे वातावरण आहे. ग्रामस्थ व लोकप्रतिनिधींनी ग्रामपंचायत पदाधिकारी, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले आहे.

# धनगर समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा ९ रोजी सत्कार सोहळा

मुखेड/प्रतिनिधी-शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय यश मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचा गौरव करून समाजात शिक्षणाची शिक्षणाची प्रेरणा वाढवण्यासाठी नांदेड जिल्हा धनगर समाजाच्या वतीने गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला आहे.

हा सोहळा रविवार, दि. ९ ऑगस्ट रोजी सकाळी १०.३० ते दुपारी ३ वाजेपर्यंत कुसुम सभागृह, व्हीआयपी रोड, येथे होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ विधीज्ञ डॉ. शिवाजीराव हाके हे असणार आहेत. कार्यक्रमात खा. रामराव वडकुते, यांचाही विशेष सन्मान होणार आहे.या कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शक म्हणून आयकर विभागाचे उपसंचालक श्रीकांत मोडक, परभणीच्या माध्यमिक शिक्षणाधिकारी सविता बिरगे, नांदेड जि.प.चे माध्यमिक शिक्षणाधिकारी माधव सलगर, एस.जी.जी. एस. अभियांत्रिकी व तंत्रज्ञान संस्थेचे संचालक डॉ. मनेश कोकोरे यांची उपस्थिती लाभणार आहे. विविध शैक्षणिक क्षेत्रात अव्वल यश मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात येणार आहे.

# बीएच सिरीज वाहनधारकांनी थकीत कर तातडीने भरावा

## अन्यथा विशेष तपासणी मोहिमेत कारवाई

नांदेड/प्रतिनिधी-बीएच (भारत) सिरीज अंतर्गत नोंदणीकृत वाहनधारकांनी थकीत वाहन कर तातडीने भरावा, अन्यथा विशेष तपासणी मोहिमेदरम्यान मोटार वाहन कायद्यानुसार कारवाई करण्यात येईल, असे आवाहन प्रादेशिक परिवहन कार्यालय, नांदेड यांनी केले आहे.

प्रादेशिक परिवहन कार्यालयाने प्रसिद्ध केलेल्या निवेदनानुसार, बीएच सिरीज वाहनांचा कर नोंदणीवेळी दोन वर्षांसाठी स्वीकारला जातो. त्यानंतर प्रत्येक दोन वर्षांनी वाहनाचा कर भरणे बंधनकारक आहे. कर भरण्याची मुदत संपल्यानंतर सात दिवसांचा ग्रेस पिरियड दिला जातो. त्यानंतरही कर न भरल्यास प्रतिदिन १०० रुपये दंड आकारला जातो. कार्यालयाच्या संगणकीय अभिलेखांनुसार सध्या काही बीएच सिरीज वाहनांचा कर थकीत असून संबंधित वाहनधारकांनी विलंब न करता थकीत कर भरावा, असे आवाहन करण्यात आले आहे.थकीत कराची वसुली करण्यासाठी प्रादेशिक परिवहन कार्यालय, नांदेडमार्फत लवकरच विशेष तपासणी मोहीम राबविण्यात येणार आहे. या मोहिमेदरम्यान थकीत कर असलेली वाहने आढळल्यास मोटार वाहन कायद्यानुसार आवश्यक ती कारवाई केली जाईल, असे सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी प्रशांत कँफ्रे यांनी कळविले आहे.

## सेवानिवृत्त अधिकारी कर्मचाऱ्यांसाठी पेन्शन अदालत

नांदेड/प्रतिनिधी-नांदेड जिल्ह्यातील महसूल विभागातून सेवानिवृत्त झालेले अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या अडचणीचे निवारण करण्यासाठी ऑगस्ट महिन्याच्या दुसऱ्या मंगळवारी (दि.११) स.११ ते १.३० वा. जिल्हाधिकारी कार्यालय येथे पेन्शन अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. सेवानिवृत्त झालेले अधिकारी कर्मचारी यांनी अडचणी निवारण्यासाठी पेन्शन अदालतीच्या दिवशी उपस्थितीत राहून तक्रारीचे निवेदन द्यावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी नांदेड यांनी केले आहे.

# कंधारमध्ये मटका अड्डयावर पोलीसांची धाड

नांदेड/प्रतिनिधी-कंधार शहरातील किल्ल्या जवळ सुरु असलेल्या मटका अड्डयावर मंगळवारी दुपारी पोलीसांनी धाड टाकुन दोन जणांना अटक करण्यात आली.

कंधार किल्ल्या जवळ मटका अड्डा सुरु असल्याची माहिती पोलीसांना मिळाली. मंगळवारी दुपारी पोलीसांच्या एका पथकाने सदरील मटका अड्डयावर धाड टाकली. लोकांकडून पैसे घेवून टाईम बाजार नावाचा मटका खेळवीत असतांना मोहंमद नईमोद्दीन मो.नसीरोद्दीन (वय ४४), इम्राज कुरेशी दोघे रा.कंधार यांना रंगेहाथ पकडले. त्यांच्याकडून रोख रक्कम, मोबाईल, मटका घेण्याचे साहित्य असा ११ हजार रुपयांचा ऐवज जप्त करण्यात आला. याप्रकरणी दोन्ही आरोपी विरुध्द कंधार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# भनगी शिवारात पोलीसांचा छापा;२७ लाखांचा ऐवज जप्त

नांदेड/प्रतिनिधी-भनगी शिवारातील गोदावरी नदीच्या पात्रातून रेती उपसा करणाऱ्या घाटावर सोमवारी सायंकाळी नांदेड ग्रामीण पोलीसांनी छापा टाकुन २७ लाख रुपयांचा ऐवज जप्त केला आहे.

भनगी शिवारात रेतीचा उपसा सुरु असल्याची माहिती पोलीसांना मिळाली. नांदेड ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस निरिक्षक ओमकांत चिंचोलकर व पोलीस कर्मचाऱ्यांनी सोमवारी सायंकाळी भनगी रेती घाटावर छापा टाकला. रेती घाटावर रेती उपसा करणारे पाच तराफे, पाच ब्रास रेती, वीना क्रमांकाचे एक ट्रक्टर असा २७ लाख ५० हजार रुपयांचा ऐवज पोलीसांनी जप्त केला आहे. याप्रकरणी पोलीसांनी जगदीश विलास सूर्यवंशी रा.पांगरी, दिलीप गच्चे रा.भनगी यांच्या विरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


## जाहीर नोटीस

प्रति,

१) मा.अधिक्षक भुमि अभिलेख, कार्यालय मुदखेड ता.मुदखेड जि.नांदेड २) ऋषिकेश पि.बापुसाहेब पाटील कल्याणे ३) माया भ्र.बापुसाहेब पाटील कल्याणे, ४) श्रावण पि.ग्यानु हटकर, ५) मारोती पि.चंदर हटकर, ६) रामराव पि.दत्ता हटकर, ७) दलीत पि. दत्ता हटकर, ८) नितीन पि.ग्यानु हटकर, ९) आनंद पि.चंदर हटकर, १०) गंगाबाई भ्र.लक्ष्मण हटकर, ११) भिवाजी पि.लक्ष्मण हटकर, १२) राजकुमार लक्ष्मण हटकर, १३) विजयकुमार लक्ष्मण हटकर,१४) वंदना मारोती चुडेवार, १५) पंचफुलाबाई गोविंदराव कल्याणे, १६) किशन सटवाजी हटकर, १७) दिलीप रोहीदास हटकर, १८) रामचंद्र लोभाजी हटकर, १९) अनुसया रमेश निखाते, २०) शामराव जळबा हटकर, २१) प्रल्हाद तोलाजी हटकर, २२) उत्तम विठ्ठल हटकर, २३) पंडीत तोलाजी हटकर, २४) साहेब तोलाजी हटकर, सर्व रा. मुगट ता. मुदखेड जि. नांदेड

विषय : मा. जिल्हा अधिक्षक भुमि अभिलेख, नांदेड यांच्याकडे प्रलंबीत प्रकरण अपील एस.आर. क्र. ४१/२०२६ या प्रकरणात पूढील तारीख ११.०८.२०२६ निश्चीत केले बाबत.

महोदय,

आपणास या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, मा.जिल्हा अधिक्षक भुमिअभिलेख, जिल्हाधिकारी परिसर, नांदेड येथे अपीलकार किशोर पि.यशवंता हटकर रा.मुगट ता.मुदखेड जि. नांदेड यांनी आपल्या विरुध्द अपील क्र.एस.आर. ४१/२०२६, सर्व्हे नं. ११४, ११५,११६ बाबत फाळणी बारा विरुध्द अपील दाखल केले असुन, प्रकरणात पुढील सुनावणीची तारीख ११.०८.२०२६ निश्चीत करण्यात आली आहे. तरी आपणास आपले म्हणणे दाखल करावयाचे असल्यास स्वत: किंवा अधिकृत वकीला मार्फत नेमलेल्या तारखेस वरील ठिकाणी उपस्थीत राहुन आपले म्हणणे सादर करावे. अन्यथा आपले काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन प्रकरणात पुढील कार्यवाही करण्यात येईल. करीता ही जाहीर नोटीस मान्यवर न्यायासनाच्या आदेशाने प्रसिध्द करण्यात येत आहे.

दिनांक : ०४.०८.२०२६

मार्फत,
स्वाक्षरित/-
ॲड.एस.एम.रावणगावे
मो.९८३४८७३०३५

अपीलकार
स्वाक्षरित/-
किशोर पि.यशवंता हटकर
रा.मुगट ता.मुदखेड जि.नांदेड

## जाहीर नोटीस

प्रति,

१) मा. अधिक्षक भुमि अभिलेख, कार्यालय कंधार ता.कंधार जि. नांदेड २) धनंजय पि.विलासराव शिंदे, ३) राजलक्ष्मी कैलास शिंदे, ४) प्रकाश चंपती राक्षसे, ५) गणेश गोविंद शिंदे, ६) बाबपुराव गोविंद शिंदे, ७) गणपती संभाजी शिंदे, ८) शेख मुस्तफा शेख मैनोद्दीन, ९) शेख मुज्जमील शेख मोहीयोद्दीन, १०) हौसाजी बालाजी गायकवाड, ११) शंकर बालाजी गायकवाड, १२) राहुल दत्ता टेंबरे, १३) गोविंद बापुजी शिंदे, १४) अनुसया संभाजी शिंदे, १५) शंकर चंपती राक्षसे, १६) अच्युत बबनराव कदम, १७) पुरभाजी माणिकराव कांबळे, १८) पांडुरंग पुंडलीक पुयड, १९) हनमंत विलास शिंदे, २०) राजलक्ष्मी कैलास शिंदे, २१) उत्तम पुरभा कांबळे, २२) ओमसाई दगडु कदम, २३) गयाबाई संजय पवळे सर्व रा.दहीकळंबा ता.कंधार जि. नांदेड.

विषय : मा. जिल्हा अधिक्षक भुमि अभिलेख, नांदेड यांच्याकडे प्रलंबीत प्रकरण अपील एस.आर. क्र. १/२०२६ या प्रकरणात पूढील तारीख १८.०८.२०२६ निश्चीत केले बाबत.

महोदय,

आपणास या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, मा.जिल्हा अधिक्षक भुमिअभिलेख, जिल्हाधिकारी परिसर, नांदेड येथे अपीलकार राजाबाई भ्र.रावसाहेब शिंदे रा. दहीकळंबा ता.कंधार जि.नांदेड यांनी आपल्या विरुध्द अपील क्र.एस.आर.१/२०२६, सर्व्हे नं.७५ व ७६ बाबत फाळणी बारा विरुध्द अपील दाखल केले असुन, प्रकरणात पुढील सुनावणीची तारीख १८.०८.२०२६ निश्चीत करण्यात आली आहे. तरी आपणास आपले म्हणणे दाखल करावयाचे असल्यास स्वतः किंवा अधिकृत वकीला मार्फत नेमलेल्या तारखेस वरील ठिकाणी उपस्थीत राहुन आपले म्हणणे सादर करावे. अन्यथा आपले काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन प्रकरणात पुढील कार्यवाही करण्यात येईल. करीता ही जाहीर नोटीस मान्यवर न्यायासनाच्या आदेशाने प्रसिध्द करण्यात येत आहे.

दिनांक ४/०८/२०२६

मार्फत,
स्वाक्षरित/-
ॲड.एस.एम.रावणगावे
मो.९८३४८७३०३५

अपीलकार
स्वाक्षरित/-
राजाबाई भ्र.रावसाहेब शिंदे
रा.दहीकळंबा ता.कंधार जि.नांदेड

## जाहीर नोटीस

प्रति,

१) मा. अधिक्षक भुमि अभिलेख, कार्यालय नांदेड ता. जि. नांदेड, २) अंबादास मारोती आरसुळे, ३) सखाराम दत्ता वड्डे, ४) जगन्नाथ आनंदराव पावडे क्र.२ ते ४ रा. बोंढार तर्फे नेरली ता. जि.नांदेड

विषय : मा. जिल्हा अधिक्षक भूमि अभिलेख,नांदेड यांच्याकडे प्रलंबीत प्रकरण अपील एस.आर. क्र. ३७/२०२६ या प्रकरणात पूढील तारीख ११.०८.२०२६ निश्चीत केले बाबत.

महोदय,

आपणास या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, मा.जिल्हा अधिक्षक भुमिअभिलेख, जिल्हाधिकारी परिसर, नांदेड येथे अपीलकार नारायण पि.रामजी आरसुळे रा. बोंढार तर्फे नेरली ता. जि. नांदेड यांनी आपल्या विरुध्द अपील क्र.एस.आर. ३७/२०२६, सर्व्हे नं. २४ बाबत फाळणी बारा विरुध्द अपील दाखल केले असुन, प्रकरणात पुढील सुनावणीची तारीख ११.०८.२०२६ निश्चीत करण्यात आली आहे. तरी आपणास आपले म्हणणे दाखल करावयाचे असल्यास स्वतः किंवा अधिकृत वकीला मार्फत नेमलेल्या तारखेस वरील ठिकाणी उपस्थीत राहुन आपले म्हणणे सादर करावे. अन्यथा आपले काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन प्रकरणात पुढील कार्यवाही करण्यात येईल. करीता ही जाहीर नोटीस मान्यवर न्यायासनाच्या आदेशाने प्रसिध्द करण्यात येत आहे.

दिनांक : ०४.०८.२०२६

मार्फत,
स्वाक्षरित/-
ॲड.एस.एम.रावणगावे
मो.९८३४८७३०३५

अपीलकार
स्वाक्षरित/-
नारायण पि.रामजी आरसुळे
रा.बोंढार तर्फे नेरली ता.जि.नांदेड

# देवापूर शिवारातील जुगार अड्ड्यावर पोलीसांची धाड

नांदेड/प्रतिनिधी-मुदखेड तालुक्यातील देवापूर शिवारात सुरु असलेल्या जुगार अड्ड्यावर स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाच्या पोलीसांनी धाड टाकुन नऊ जणांना अटक केली आहे. त्यांच्याकडून पोलीसांनी ३ लाख ३४ हजार रुपयांचा ऐवज जप्त केला आहे.

देवापूर पुर्नवसाहतीमध्ये जुगार अड्डा सुरु असल्याची माहिती स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाला मिळाली. पोलीस अधीक्षक डॉ.नीलाभ रोहन यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अतुल भोसले यांच्या आदेशावरुन फौजदार महेश कोरे, फौजदार मिलिंद सोनकांबळे व पोलीस कर्मचाऱ्यांनी मंगळवारी जुगार अड्ड्यावर धाड टाकली. पैसे लावून तिर्रट नावाचा जुगार खेळत असतांना पोलीसांनी सोनु दत्ता सरोदे (वय ३५) रा.डॉ.आंबेडकरनगर, नांदेड, गणेश गुलाब पवार (वय २०) रा.आमदुरा ता.मुदखेड, रामदास संभाजी पवार (वय २३) रा.आमदुरा, अक्षय मधुकर नंदनवरे (वय ३०) रा. राहुलनगर, वाघाळा, भैय्यासाहेब राजु जमदाडे (वय २१) रा.राहुलनगर, वाघाळा, अरुण शिवाजी पांडुर्णे (वय २४) रा.वासरी, माधव शंकर बुक्तरे (वय २५) रा. पावडेवाडी,नांदेड, मो.अयुब अब्दुल रशीद (वय २८) रा.रहेमतनगर,नांदेड, कृष्णा भुजंगा इसनकर (वय २७) रा.बडपूरा,नांदेड या नऊ जणांना अटक करण्यात आली. राजु खानसोळे रा. शिवाचीवाडी ता.मुदखेड व आकाश परनाळे रा.कौठा, नांदेड हे दोघेजण फरार झाले आहेत. पोलीसांनी घटनास्थळावरुन रोख रक्कम, नऊ मोबाईल व इतर साहित्य असा ३ लाख ३४ हजार रुपयांचा ऐवज जप्त केला. या प्रकरणी ११ जणांविरुध्द मुदखेड पोलीस ठाण्यात मुंबई जुगार कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# बंधाऱ्यातील पाण्यात पडून मजुराचा मृत्यू



किनवट/प्रतिनिधी-किनवट शहरालगतच्या पैनगंगानदीवरील निर्माणाधीन असलेल्या उच्च पातळी बंधाऱ्याच्या कामावरील लालसिंग प्रतापसिंग धुर्वे नामक ३२ वर्षीय मजुराचा पाण्यात बुडून मृत्यू झाला. शोधाशोध केल्यानंतर आज (५ ऑगस्ट) त्याचा मृतदेह सापडला असून गोकुंदा येथील उपजिल्हा रुग्णालयात शवविच्छेदन करण्यासाठी पाठवला आहे.

पैनगंगानदीवर शारदा कन्स्ट्रक्शन कंपनीद्वारा उच्चपातळी बंधाऱ्याचे काम चालू आहे. या कंपनीकडे कामावर असलेला मध्यप्रदेशातील लालसिंग प्रतापसिंग धुर्वे याचा पैनगंगा नदी पात्रातील पाण्यात बुडून मृत्यू झाला. किनवट पोलीसांना घटनेची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक कराड यांच्या मार्गदर्शनाखाली पोहेकाँ चंद्रशेखर मुंडे आणि पोहेकाँ. तुकाराम वाडगुरे यांनी घटनास्थळी जाऊन शोध घेतला आणि ५ ऑगस्ट रोजी बाबूलाल जाटवे आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या मदतीने मृतदेह पाण्याबाहेर काढून शवविच्छेदनासाठी गोकुंदा येथील उपजिल्हा रुग्णालयात पाठवला. वृत्त पाठवेपर्यंत शवविच्छेदन प्रक्रिया सुरू होती. शवविच्छेदन प्रक्रियेनंतर मृतदेह कंपनीच्या स्वाधीन करण्याची शक्यता व्यक्तविली जात होती. मृतकाचे नातेवाईक आल्यास त्यांच्याकडे मृतदेह सोपवला जाऊ शकतो. पोलीसांच्या पुढील तपासावर अनेक गोष्टी निर्भर आहेत. कारण मृतकाचा मोबाईल, बूट वगैरे काही साहित्य हाती लागले आहे. हा एकटाच त्यांच्या कॅम्प पासून पुलाच्या खालच्या बाजूला का गेला ?, सोबत कोणी होते का ?, स्नानाची व्यवस्था कॅम्पसमध्ये का करण्यात आली नव्हती ? अशा शंकांना वाव मिळत असल्याने पोलिस तपासाकडे लोकांचे लक्ष लागणे स्वाभाविक आहे. किनवट पोलीस ठाण्यात गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. पोलीस निरीक्षक गणेश कराड यांच्या मार्गदर्शनाखाली पोहेकाँ. तुकाराम वाडगुरे यांनी पंचनामा केला. पोहेकाँ. चंद्रशेखर मुंडे अधिक तपास करीत असल्याचे सूत्रांकडून समजते.



कामगार नेते व सायं दै.नांदेड वार्ताचे मुख्य संपादक ॲड.प्रदीप नागापूरकर यांच्या वाढदिवसानिमित्त कंत्राटी स्वच्छता कामगार महिलांनी शाल व पुष्पगुच्छ देवून सत्कार केला. यावेळी कॉ.वैशाली धुळे, कॉ.मिना हटकर, कॉ.वंदनाबाई पवळे, कॉ.प्रेमीला कांबळे, कॉ.अनिता गजभारे, कॉ.चौउत्रा सूर्यवंशी, कॉ.अहिल्याबाई नरवाडे, कॉ.गणेश संदुपटला, नागसेन डोंगरे, संजय लष्करे यांच्यासह इतर उपस्थित होते.

# तिकीट तपासणी मोहिमेत सहा लाखांचा दंड वसूल

नांदेड/प्रतिनिधी-दक्षिण मध्य रेल्वे मुख्यालयाच्या निर्देशानुसार राबवण्यात आलेल्या तिकीट तपासणी मोहीमेत नांदेड विभागात ३ ऑगस्ट रोजी सकाळी ४.३० ते सायंकाळी ७.३० या कालावधीत एका दिवसात विनातिकीट प्रवास, अनियमित प्रवास आणि बुक न केलेले सामान अशा एकूण १ हजार ८७ प्रकरणांची नोंद करण्यात आली असून ५ लाख ९८ हजार ३३५ इतका महसूल वसूल करण्यात आला.

ही मोहीम हजूर साहिब नांदेड-आदिलाबाद, हजूर साहिब नांदेड-परभणी-जालना-छत्रपती संभाजीनगर - मनमाड, परभणी-परळी वैजनाथ आणि पूर्णा-अकोला या विभागांमध्ये राबविण्यात आली. मोहिमेत ३२ तिकीट चेकिंग स्क्वॉड कर्मचारी, १४९ तिकीट तपासणी कर्मचारी, १४ स्टेशन तपासणी कर्मचारी, ४ विभागीय वाणिज्य निरीक्षक तसेच ३ रेल्वे सुरक्षा बल कर्मचारी सहभागी झाले होते. या दरम्यान २९ गाड्यांची सखोल तपासणी करण्यात आली. दरम्यान प्रवाशांना वैध तिकीट घेवूनच प्रवास करण्याचे संपूर्ण प्रवासादरम्यान प्रवासासंबंधी योग्य कागदपत्रे जवळ बाळगण्याचे आणि रेल्वे नियमांचे पालन करण्याचे आवाहन दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागाने केले आहे.

## वीरशैव लिंगायत समाजातील गुणवंतांचा २६ रोजी सत्कार

नांदेड/प्रतिनिधी-शिवा अखिल भारतीय वीरशैव बहुजन कर्मचारी महासंघ, नांदेड जिल्ह्याच्या वतीने वीरशैव लिंगायत समाजातील गुणवंतांचा सत्कार व करिअर मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. बुधवार, दि. २६ ऑगस्ट रोजी कुसुम सभागृह, नांदेड येथे आयोजित समारंभात शिवा संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. मनोहर धोंडे यांच्या अध्यक्षतेखाली व मान्यवरांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थी व क्रीडापटूंचा सत्कार समारंभ पार पडणार आहे.शिवा अखिल भारतीय वीरशैव बहुजन कर्मचारी महासंघामार्फत प्रतिवर्षाप्रमाणे यंदाही भव्य कार्यक्रमात गुणवंतांना गौरविण्यात येणार आहे.

# पाच लाख रुपयांची फसवणूक केल्या प्रकरणी गुन्हा दाखल

नांदेड/प्रतिनिधी-एसबीआयची पॉलीसी बंद करण्यासाठी व खात्यातील रक्कम मिळवून देण्यासाठी एका महिलेची पाच लाख ३६ हजार रुपयाची फसवणूक केल्या प्रकरणी सहा जणांविरुध्द तामसा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तामसा येथील मौनिका राजेंद्रसिंह कच्छवे ठाकूर यांनी भारतीय स्टेट बँकेची पॉलीसी काढली होती. सदरील पॉलीसी बंद करण्यासाठी मौनिका कच्छवे ठाकूर ह्या विमा पॉलीसी एजंटाकडे गेल्या होत्या. सदरील पॉलीसी बंद करुन त्यामधील रक्कम काढून देण्यासाठी ३ जुलै २०२६ ते ३० जुलै २०२६ या काळात मौनिका कच्छवे ठाकूर यांच्याकडून पियुष सोमाणी, रवी कपूर, दीशा अग्रवाल, रिचा मिर्श्रा, गिता बॅनर्जी, अंकिता राणे सर्व रा.तामसा यांनी संगनमत करुन कस्टमर आयडी विमा अकाऊंट खाते चालू करण्यासाठी व सर्व्हीस टॅक्स भरण्यासाठी असे वेगवेगळे कारणे सांगून ५ लाख ३६ हजार रुपये घेतले. परंतु पॉलीसी बंद केली नाही. तसेच पॉलीसीच्या खात्यातील रक्कम सुध्दा मिळवून दिलेली नाही. ५ लाख ३६ हजार रुपये घेवून सहा जणांनी मौनिका कच्छवे ठाकूर यांची फसवणूक केली. आपली फसवणूक केल्याचे लक्षात आल्यानंतर मौनिका कच्छवे ठाकूर यांनी तामसा पोलीस ठाण्यामध्ये रितसर तक्रार दाखल केली. याप्रकरणी सहा जणांविरुध्द तामसा पोलीस ठाण्यात विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# हर्षवर्धन सपकाळ यांच्या वक्तव्याचा राष्ट्रवादी काँग्रेसने केला निषेध

उमरखेड/प्रतिनिधी-राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या विषयी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी आक्षेपार्ह व अवमानकारक वक्तव्य केले. या वक्तव्याचा उमरखेडमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्यावतीने निषेध करण्यात आला.

आज (बुधवार) दि.५ ऑगस्ट रोजी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष शंकरराव तांगलकर यांच्या नेतृत्वाखाली उपविभागीय अधिकारी, उमरखेड यांना निवेदन देण्यात आले. निवेदनात म्हटले आहे की, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी सार्वजनिक जीवनातील व्यक्तींविषयी वापरलेली भाषा ही लोकशाही मूल्यांना व सभ्य राजकीय परंपरेला बाधा पोहोचवणारी आहे. मतभेद व्यक्त करणे हा प्रत्येक नागरिकाचा लोकशाही अधिकार असला तरी, टीका करताना सभ्य, सुसंस्कृत आणि जबाबदार भाषेचा वापर होणे अपेक्षित आहे. वैयक्तिक अवमान किंवा आक्षेपार्ह वक्तव्यामुळे समाजात चुकीचा संदेश जातो आणि सामाजिक सलोखा बिघडण्याची शक्यता निर्माण होते. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या विषयी केलेले वक्तव्य हे निषेधार्ह आहे असे निवेदनात म्हटले आहे. यावेळी तालुकाध्यक्ष शंकरराव तांगलकर, वनिता साचिन चव्हाण, सौ. रेखा अशोकराव गायकवाड, सचिन देवराव चव्हाण, श्रीकांत प्रकाश जाधव, दामोधर शामराव इंगोले, देविदास प्रकाश राठोड, गजानन शामराव इंगोले यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.




# कॉ.राजू देसले यांना 'क्रांतिसिंह नाना पाटील पुरस्कार' प्रदान



नांदेड/प्रतिनिधी-शेतकरी, कामगार आणि सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीत गेली ३५ वर्षे सातत्याने कार्यरत असलेले भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे महाराष्ट्र राज्य सहसचिव कॉम्रेड राजू देसले यांना यंदाचा 'क्रांतिसिंह नाना पाटील पुरस्कार' प्रदान करण्यात आला.

केज (जि. बीड) क्रांतिसिंह नाना पाटील शेतकरी विकास प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित सोहळ्यात माजी आ.भाई बाळाराम पाटील यांच्या हस्ते त्यांना सन्मानपत्र, स्मृतिचिन्ह आणि शाल देऊन त्यांना गौरविण्यात आले.लोकशाहीर कॉम्रेड अण्णाभाऊ साठे जयंती, क्रांतिसिंह कॉम्रेड नाना पाटील जयंती आणि शेतकरी कामगार पक्षाच्या वर्धापनदिनाचे औचित्य साधून हा पुरस्कार सोहळा पार पडला.पुरस्कार प्रदान करताना माजी आमदार भाई बाळाराम पाटील म्हणाले, कॉ.राजू देसले हे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे आणि क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या विचारांचा वारसा कृतीतून पुढे नेत आहेत. त्यांनी शेतकरी, कामगार, असंघटित कामगार, योजना कर्मचारी आणि वंचित घटकांच्या न्याय्य हक्कांसाठी सातत्याने संघर्ष केला आहे. मार्क्सवादी विचार अन्याय आणि विषमतेविरुद्ध लढण्याची प्रेरणा देतात. आज शेतकरी, विद्यार्थी आणि कामगारांचे प्रश्न सोडविण्यासाठी लाल बावटा चळवळ अधिक मजबूत करण्याची गरज आहे.

पान १ वरुन

## सुप्रिम कोर्टात कपिल सिब्बल यांचा...

आयोगाने विधिमंडळ पक्षातील बहुमताला महत्त्व देत चुकीचा निकष लावल्याचा आरोप केला. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी शिंदे गटाला दिलेली मान्यता आणि त्यानंतरचे निर्णयही बेकायदेशीर असल्याचे त्यांनी न्यायालयाला सांगितले. लोकशाहीत मतदार पक्ष आणि त्याच्या चिन्हाला मतदान करतात. निवडून आल्यानंतर आमदारांनी दुसऱ्या पक्षाशी हातमिळवणी करून सरकार बदलणे ही लोकशाहीच्या मूलभूत तत्त्वांवर घाला घालणारी बाब असल्याचे सिब्बल यांनी नमूद केले. या प्रकरणावरील सुनावणी अंतिम टप्प्यात असून, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाकडे राज्याच्या राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

## राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार...

आ.प्रताप पाटील चिखलीकर म्हणाले की, हर्षवर्धन सपकाळ यांनी केलेल्या वक्तव्याची जाहीर माफी मागावी. अन्यथा नांदेडमध्ये त्यांना फिरु देणार नाही असा इशाराही त्यांनी दिला. राजकीय मतभेद असले तरी वैयक्तीक पातळीवर अपमानास्पद वक्तव्य करणे योग्य नसल्याचे आ.चिखलीकर यांनी म्हटले. या आंदोलनात महानगराध्यक्ष व माजी आ.ओमप्रकाश पोकर्णा, माजी आ.मोहनअण्णा हंबर्डे, जिल्हाध्यक्ष शिवराज पाटील होटाळकर, बाळासाहेब रावणगावकर, माधव पावडे, सुनील नानवटे, शिरीष देशमुख गोरठेकर, सुंनदाताई जोगदंड, डॉ. मीनाक्षीताई कागडे, डॉ. उत्तम सोनकांबळे, लक्ष्मीकांत पद्मवार, नगरसेवक साबेर चाऊस, संतोष क्षीरसागर, मनोहर पाटील भोसीकर, बालाजी पाटील शिंदे, स्वप्नील लुंगारे, नेताजी भोसले यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते.

## जीआरनंतर दोन नगरसेविकांचे...

आंदोलनापूर्वीच काही कुणबी प्रमाणपत्रे अवैध ठरल्याने आरक्षणाच्या प्रश्नाला नवे कायदेशीर आणि प्रशासकीय परिमाण मिळाले आहे. या घडामोडींनंतर शासनाची भूमिका काय असेल आणि प्रमाणपत्र पडताळणीबाबत पुढे कोणते धोरण अवलंबले जाईल, याकडे राज्याचे लक्ष लागले आहे.कुणबी प्रमाणपत्रांच्या वैधतेवर निर्माण झालेल्या या नव्या वादामुळे मराठा आरक्षणाचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून, येत्या काही दिवसांत न्यायालयीन, प्रशासकीय आणि राजकीय पातळीवर महत्त्वाच्या घडामोडी घडण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

## वीजेचा शॉक लागून...

स्थानिक नागरिक घटनास्थळी दाखल झाले. त्यांच्या मदतीने मृतदेह खाली उतरवून शासकीय रुग्णालयात शव-विच्छेदनासाठी पाठविण्यात आला. शुऐब हे वीजेच्या खांबावर नेमके कोणत्या कारणासाठी गेले होते, याचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. या प्रकरणाचा पुढील तपास वजीराबाद पोलीस करत आहेत. या घटनेने परिसरात शोककळा पसरली आहे

# मुखेडमध्ये डॉक्टरांकडून वैद्यकीय सेवा बंद यशस्वी

मुखेड/प्रतिनिधी-आयएमए राज्य संघटनेच्या वतीने पुकारण्यात आलेल्या २४ तासांच्या राज्यव्यापी बंदला मुखेड शहरातील डॉक्टरांनी प्रतिसाद देत दि. ४ ऑगस्ट रोजी आंदोलनात सहभाग नोंदविला. इंडियन मेडिकल असोसिएशन मुखेड शाखेने या बंदला पूर्ण पाठिंबा जाहीर केला असून, याबाबतचे निवेदन तहसील प्रशासनास देण्यात आले.

आयएमएचे अध्यक्ष डॉ. अशोक कौरवार,मुखेड भूषण डॉ. दिलीप पुंडे, सचिव डॉ. कैलाश पाटील यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात आले. महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलमध्ये सीसीएमपी कोर्स पूर्ण केलेल्या बीएचएमएस डॉक्टरांना नोंदणी देण्याच्या प्रस्तावाला आयएमएसह एमएआरडी मार्ड, एएसएमआय आणि इतर विविध वैद्यकीय संघटनांनी तीव्र विरोध दर्शविला आहे. संघटनेच्या निवेदनानुसार, या प्रस्तावामुळे आधुनिक सर्वोपचार (ॲलोपॅथीक) वैद्यकीय व्यवस्थेचे वैज्ञानिक निकष, गुणवत्ता व विश्वासार्हता धोक्यात येऊ शकते. तसेच रुग्णांच्या सुरक्षिततेवर आणि सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेवर दीर्घकालीन परिणाम होण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे. या विषयावर शासनाकडे अनेकवेळा निवेदने देवून भूमिका मांडण्यात आली; मात्र त्याकडे पुरेसे लक्ष दिले गेले नसल्याचा आरोप संघटनेने केला आहे. निवेदन देताना डॉ. दिलीप पुंडे, डॉ. अशोक कौरवार, डॉ. व्यंकट सुभेदार भोसले, डॉ. प्रशांत खंडागळे, डॉ. रामराव श्रीरामे, डॉ. महेश पत्तेवार, डॉ. आकाश अंबेकर, डॉ. नितीन अंबेकर, डॉ. श्रीहरी बुडगेमवार, डॉ. कैलास पाटील, डॉ. श्वेतांग डोंगरगावकर आदी उपस्थित होते.

पान १ वरुन

## राजकारणात...

विद्यार्थ्यांना संघटनेकडून सुरुवातीपासूनच वैद्यकीय तसेच कायदेशीर मदत पुरविण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. सरकारच्या प्रतिनिधींशी सातत्याने संवाद सुरू असून त्यातून अनेक विद्यार्थ्यांवरील गुन्हे मागे घेण्यात आल्याचा दावा दास यांनी केला. उर्वरित प्रकरणांतील एफआयआर मागे घेण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात असल्याचेही त्यांनी सांगितले.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग ॲण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com, मो.९४२२१७४७७४